सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्र.तांशिस/प्राकाना/शैवि-1/ तक्रार/2020/ 1423 दिनांक:- 09 JUL 2020

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदवी,
पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शै. वर्ष 2020-21 मध्ये विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था/अभ्यासक्रम टप्याटप्याने बंद करण्याबाबत.
संदर्भ:- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. टीईएम-2020/प्र.क्र.85/तांशि-4, दि. 23 जुन 2020
२. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/संस्था बंद/2020/489, दि. 05 जुलै 2020

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये ज्या संस्थेने संस्था/अभ्यासक्रम टप्याटप्याने बंद करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, फार्मसी कौंन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली, वास्तुकला परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत त्यास अनुसरून शासनाने संबंधीत संस्थेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे अन्य महाविद्यालयात समावेशन करण्यासाठी त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आपणार नाही तसेच संस्था बंद करण्यासाठी संबंधीत संस्थेने दिलेल्या हमीपत्राप्रमाणे उर्वरित विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याची दक्षता घ्यावी असे सुचित केले आहे. तसेच जी संस्था विद्यार्थांच्या शिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण करतील अश्या संस्थांची संयुक्त खात्यातील मुदत ठेव परत करण्यात येणार नाही याबाबत नोंद घेण्याबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार संस्थेने वरीलप्रमाणे नमुद केल्यानुसार कार्यवाही करावी व याबाबत कुठल्याही विद्यार्थ्यांची तक्रार शासनास अथवा या कार्यालयास प्राप्त होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

**सहपत्र**:- संदर्भिय पत्र

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३,
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/संस्था बंद/२०२०/४८९
दिनांक : 08 JUL 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर, अमरावती, औरंगाबाद,
नाशिक, पुणे व मुंबई.

विषय: विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था/अभ्यासक्रम टप्याटप्याने बंद करणेबाबत.
संदर्भ: शासन पत्र क्र. टीईएम-२०२०/प्र.क्र.८५/२०/तांशि-४, दि. २३ जून २०२०.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी शै.व.२०२०-२१ मध्ये संस्था/अभ्यासक्रम टप्याटप्याने बंद करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, वास्तूकला परिषद, नवी दिल्ली व शासनाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत त्यास अनुसरुन शासनाने संबंधित संस्थेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे अन्य महाविद्यालयात समावेशन करण्यासाठी त्यांच्याबर संबंधित संस्थेकडून कोणत्याही प्रकारचा दबाव येणार नाही, तसेच संस्था बंद करण्यासाठी संबंधित संस्थेने दिलेल्या हमीपत्राप्रमाणे उर्वरित विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण विना अडचण शिक्षण देतील, याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी, असे सूचित केले आहे. तसेच ज्या संस्था विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण करतील, अशा संस्थांची संयुक्त खात्यातील मुदत ठेव परत करण्यात येवू नये, अशा सूचना संबंधित संस्थांना निर्गमित कराव्यात. (सोबत संदर्भांकित पत्राची प्रत जोडण्यात येत आहे.)

संदर्भीन शासन पत्रान्वयें सूचित केलेल्या सूचना आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील या संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना आपले स्तरावरुन निर्गमित करण्यात याव्यात व याबाबतचा कार्यपालन अहवाल उलटटपाली सादर करावा.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.